एस.सी.सी. नं. १२७/२०२४
इंद्रश्वर शुगर वि. अविनाश
निशाणी क्र. १४ खाली

एस.सी.सी. नं. १२७/२०२४ नि.क्र. १४ खाली

## दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात

**फिर्यादीचा पुढील सरतपास फिर्यादी तर्फे श्री. ए. एस. जगताप वकील साहेब यांचे मार्फत :—**

मी दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला असुन मी शपथपत्रावर वाचुन सही केली. आता मला दस्त यादी निशाणी क्र. २१ सोबत दाखल असलेला दस्त ऐवज क्र. १ आरोपीने दिलेला धनादेश दाखवण्यात आला त्यावर आरोपीची सही आहे त्यातील मजकूर बरोबर आहे त्यास नि. २२ देण्यात येते. दस्त ऐवज कं. २ आरोपीने फिर्यादी सोबत केलेला उसतोड वाहतुकीचा करारनामा केलेला आहे. त्यास एकत्रितपणे नि. २३ देण्यात येत आहे. त्यावर आरोपी व आरोपीचे जामीनदार तसेच संबधिताच्या सहया आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. साक्षीदार म्हणून माझी पण सही आहे. दस्त ऐवज यादी नि. क्र. ३ सोबत दस्त ऐवज कं. २ धनादेश बॅकेंत वटविण्यासाठी लावण्यात आलेली पावती आहे त्यावर उस्मानाबाद जनता बॅकेंचा शिक्का व सही आहे त्यास नि. २४ देण्यात येते. दस्त ऐवज कं. ३ उस्मानाबाद जनता बॅकेंने दिलेला चेक रिटर्न मेमो आहे त्यावर बॅक मॅनेजरची सही आहे त्यास नि. २५ देण्यात येत आहे. दस्त ऐवज कं. ४ फिर्यादीने आरोपीस पाठविलेले रक्कम मागणी नोटीस आहे त्यावर माझी तसेच फिर्यादी संस्थेचे वकिल ए. एस. जगताप यांची सही आहे. त्यास नि. २६ देण्यात येत आहे. दस्त ऐवज कं. ५ नोटीस पाठविलेबद्दल पोष्टाची पावती आहे. त्यास नि. २७ देण्यात येत आहे. दस्त ऐवज कं. ६ आरोपीस नोटीस मिळालेबद्दल पोष्टाची पोंच पावती आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास नि. २८ देण्यात येत आहे.

एस.सी.सी. नं. १२७/२०२४
इंद्रश्वर शुगर वि. अविनाश
निशाणी क्र. १४ खाली

**आरोपी व त्याचे विधीज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, सबब उलटतपास नाही.**

"श्रवणोत्तर स्विकृत"

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.08.01 16:36:50 +0530

( दिलीप गं. जगताप )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.

दिनांकः— ०१/०८/२०२६